# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


## प्रेस नोट

दिनांक 01/04/2021 (गुरूवार)
(सकाळ)

---

### जिवानाशी ठार करण्याचा प्रयत्न करणाऱ्या आरोपीला अटक

पो.स्टे. अरोली :– अंतर्गत 5 कि.मी अंतरावर मौजा तुमान येथे दिनांक 31/03/2021 चे 09.00 वा. ते 09.15 वा. दरम्यान फिर्यादी नामे– सरताज ताराचंद रंधई (जखमी), वय 24 वर्ष रा. तुमान हा जेवनाचा टिफीन घेवून निमखेडा येथे गहु भरण्यासाठी मजुरीने जात होता. त्यादरम्यान गावातील प्राथमिक शाळेसमोर आरोपी क्र. 1) मिथुन राजकुमार चवरे वय 30 वर्ष, रा. बागडीपार शांतीनगर, नागपूर व 2) आकाश जयदेव झडावणे वय 24 वर्ष रा. तुमान हे दोघेही आरोपी क्र 1. याचे गाडीने (हिरो डयुस्टने) आले होते. तेव्हा आरोपी क्र 1) मिथुन चवरे हा फिर्यादीला म्हणाला की, ''तु आरोपी क्र 2. आकाश याचे पत्नीला गुलाल रंग लावला का?'' त्यावर त्याने म्हटले की, ''मी तिला रंग लावला नाही'' असे म्हणताच आरोपीतांनी फिर्यादीचे पोटावर चाकुने मारल्याने त्याला गंभीर जखमी करून जिवाने मारण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर फिर्यादीने घाबरून आरोपी क्र 1. ला धक्का दिला व स्वताला सोडविले आणि बचावासाठी आरोपी क्र 2 ला दगड विठाचे ढिगाऱ्यावर ढकलुन दिले त्यामुळे त्याचे डोक्याला मार लागला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. अरोली येथे आरोपीतांविरुध्द कलम 307, 34 भादंवी कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीला क्र. 2 ला अटक करण्यात आली असून गुन्हयाचा पुढील तपास पो.उप.नि. ऋषिकेश चाबुकस्वार पो.स्टे. अरोली मो. न. 9867806415 हे करीत आहे.

### दुखापत

पो.स्टे. अरोली :– अंतर्गत 5 कि.मी अंतरावर मौजा तुमान येथे दिनांक 31/03/2021 चे 09.00 वा. ते 09.15 वा. दरम्यान फिर्यादी नामे– मिथुन राजकुमार चौरे वय 30 वर्ष रा. बागडीपार शांतीनगर, नागपूर याला आरोपी नामे 1) सरताज ताराचंद रंधई वय 24 वर्ष रा. तुमान 2) विजय चंद्रभान वानखेडे रा. तुमान यांनी संगनमत करून रस्त्यात थांबवुन फिर्यादीला म्हटले की, ''तु मला शिवीगाळ का केली'' असे म्हणुन आरोपीतांनी फिर्यादीला हातबुक्कीने व दगडाने मारहाण करून जखमी केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. अरोली येथे आरोपीतांविरुध्द कलम 341, 324, 34 भादंवी कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पो. हवा. भगवान चांदेवार पो. स्टे. अरोली मो. न. 9765221116 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर